जि.प. रत्नागिरी.
ग्राम पंचायत विभाग
आवक तारीख 20 AUG 2019
संबंधित शाखा - VPC-1
आवक क्रमांक -
तारीख -
अधि./ सहा.ग.वि.अ./ उप मु.का.अ.(ग्रा.पं.)

जा.क्र.पसर/२४X७/तक्रार/चौ./४४२८/२०१९
पंचायत समिती रत्नागिरी
दि.१४/०८/२०१९.

मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद रत्नागिरी

विषय : रत्नागिरी २४X७ तक्रार निवारण कक्षात नोंदविलेल्या तक्रारी बाबत.
संदभ : १) ऑनलाईन तक्रार क्र.२०/०६/१९ दि.२८/०६/२०१९.
तक्रारदाराचे नाव श्रीम. सुमन प्रभाकर नलावडे
२) जा.क्र. रजिप/साप्रवि/ग्रापं/व्हीपीसी-१०/४३३९/२०१९ दि.६/०७/२०१९.
३) सरपंच, ग्रामपंचायत खालगाव, ता.जि. रत्नागिरी यांच्या दि.५/०८/२०१९ चा अहवाल.

महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये रत्नागिरी २४X७ तक्रार निवारण कक्षात नोंदविलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सरपंच ग्रामपंचायत खालगाव यांनी दि.५/०८/२०१९ चा अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तो पुढील प्रमाणे.

श्रीम. सुमन प्रभाकर नलावडे यांनी घरापर्यंत जाण्यासाठी रस्ता मिळण्याबाबत तक्रार अर्ज दिलेला असून रस्ता होणेकामी ग्रामपंचायतीने यापूर्वी तक्रारदार श्रीम सुमन नलावडे यांच्या घरी दि.१२/०६/२०१८ रोजी प्रत्यक्षात जाऊन रस्ता होणेबाबत पाहणी केली. शेजारी जागा मालक श्री लाखाट व श्री डोंगरे यांचे बांधकाम हटवून पायवाट करण्याचे निश्चित झाले होते व होणारा खर्च श्रीम सुमन प्रभाकर नलावडे यांनीच करावयाचा होता. तसेच त्यांनीच ते काम करुन घ्यावयाचे त्यावेळी मान्य केले होते. परंतु आज पर्यंत रस्ता स्वत: करुन न घेता वारंवार तक्रार करीत राहतात. तसेच रस्ता झाल्यानंतर संबंधित जमिन मालकाचे संमती पत्रक घेऊन रस्ता नोंद करणेत यावा असे लेखी पत्र ग्रामपंचायतीने जा.क्र.६६८ दि.१७/११/२०१८ रोजी पाठविले होते. तेव्हा पासून आजपर्यंत कोणतेही संमती पत्र ग्रामपंचातीकडे मिळाले नाही. संमतीपत्र मिळाल्याशिवास तक्रारदार यांना रस्ता देता येणार नाही. असे ग्रामपंचायतीने कळविले आहे. त्याची झेरॉक्स प्रत या सोबत जोडण्यात आली आहे. तरी येणे प्रमाणे अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

गटविकास अधिकारी (वर्ग १)
पंचायत समिती रत्नागिरी

Scanned by CamScanner